# जखम

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**जखम : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १८०/-

# जखम

# १

'रविवारचा इशारा! तीन आणे! इशारा!'

अशी आरोळी मारीत सायकलवरून जाणाऱ्या पोराकडे बघून माडीवरच्या खिडकीत उभी राहिलेली सुगंधा स्वत:शीच किंचित् हसली...

थोड्याच वेळापूर्वी घडलेला एक प्रसंग तिला आठवला.

खादीचा पोशाख केलेले एक वयस्क गृहस्थ जिन्याच्या पायऱ्या चढून दार लोटून आत आले होते. त्यांनी विचारलं होतं, ''अच्युतराव आहेत का घरात?''

तिनं सांगितलं होतं, ''नाहीत.''

''नाहीत? त्यांच्या साप्ताहिकाच्या कचेरीत गेलो, तिथे कळलं घरी असतील, म्हणून इथे आलो. इथेही नाहीत! कुठे गेले आहेत? केव्हा येतील? वाट पहात बसू का जरा वेळ?''

सुगंधानं हसून म्हटलं होतं, ''बसा म्हणून सांगितलं असतं आपल्याला, पण नाना कुठे आहेत तेही मला माहीत नाही, आणि केव्हा येतील त्याचाही नेम नाही–''

''मग कशाला बसू?''

''काही निरोप सांगायचा असेल आणि माझ्याजवळ सांगायला हरकत नसेल तर–''

त्या गृहस्थांनी एकदम विचारलं होतं, ''तू त्यांची मुलगी, नव्हे का?'' तिनं हसून मान हालविल्यावर ते पुढे म्हणाले होते, ''हरकत कसली? अच्युतरावांना मला जे काही सांगायचं आहे ते काही खाजगी नाही. त्यांच्या मुलीजवळ

सांगण्यासारखंच आहे. तुझ्या नानांना माझा एवढाच निरोप सांग, जरा बेतानं लिहित जा. केवळ वर्तमानपत्र खपावं म्हणून अच्युतराव वेडं वाकडं लिहितील अशी शंका घ्यायला जागा नाही. ते प्रामाणिक आहेत, ध्येयनिष्ठ आहेत याबद्दल त्यांच्या मित्रांचीच नव्हे तर शत्रूंचीदेखील खात्री आहे. 'इशारा' साप्ताहिक फायद्यात नसतानाही त्यांनी चालविलं आहे, साऱ्यांना ठाऊक आहे. देशहितासाठी जे लिहिलं पाहिजे असं त्यांना वाटतं तेच आपल्या पत्रात ते छापतात याबद्दलही वाद नाही. पण-पण लिहिण्यात इतका कठोरपणा नसावा. जे लिहायचं ते थोड्या मार्दवानं लिहिता येतं. अच्युतरावांसारख्या लेखणीबहाद्दराला आम्ही काय शहाणपणा शिकवायचा? पण रहावत नाही म्हणून त्यांना सांगायला आलो की इतकं तापून लिहू नये.'' त्यांनी 'इशारा'च्या ताज्या अंकाची घडी इतका वेळ हातात धरली होती ती उलगडून सुगंधापुढे धरल्यासारखं करून ते म्हणाले, ''आजच्या अंकातला गोवा सत्याग्रहावरचा हा मजकूर वाचलास ना तू?''

सुगंधानं मानेनं 'हो' म्हटलं.

त्यांनी विचारलं, ''कसा वाटला हा मजकूर तुला?''

ती गप्प राहिली होती.

''गोव्याच्या बाबतीत नेहरू इतके थंड का रहात आहेत ते कळण्यासारखं नाही खरचं. पण ते कसंही असलं तरी त्यांच्या हेतूबद्दल आणि धैर्याबद्दल शंका घेऊन इतकं जळजळीत लिहू नये. असलं लिखाण वाचून मिटक्या मारणारी माणसं पुष्कळ आहेत. पण आमच्यासारख्यांना हे वाचवत नाही. वाचून यातना होतात.'' 'इशारा'तल्या दुसऱ्या एका कॉलमकडे बोट दाखवून ते म्हणाले, ''गोवा सत्याग्रहाच्या चळवळीला अच्युरावांचा अगदी नि:शंक पाठिंबा आहे असंही म्हणायची सोय नाही. कारण या सत्याग्रहासाठी बेकार गुंड लोक नावं नोंदवीत आहेत, आणि फंड देणारांनी जरा विचारपूर्वक मदत करावी असं या कॉलमात लिहिलं आहे. 'इशारे आणि फटकारे!' अशा मथळ्याचं हे सदर मागच्या अंकापासून सुरू झालेलं आहे. या सदराची शैली अच्युतरावांची स्वत:ची खचित नाही. कुणी नवाच लेखक मिळविलेला दिसतोय. कोण आहे या सदराचा लेखक? कुणी तरी पोरसवदा तरुण दिसतो. लिहिणं फार खुमासदार आहे; परंतु बेताल आहे, जहरी आहे. कोण आहे हा लेखक? माहीत आहे का तुला?''



सुगंधाला माहीत होतं. सुरेंद्राला तिनं पाहिलं नव्हतंच; परंतु नानांनी त्याला उपसंपादक म्हणून 'इशारा'च्या स्टाफवर घेतल्याचं त्यांच्याकडून तिला कळलं होतं...

परंतु त्या गृहस्थाच्या प्रश्नाला तिनं उत्तर दिलं, ''मला माहीत नाही.''

ते गृहस्थ म्हणाले, ''बरं, असेल कुणी. कोण आहे ही मुद्याची गोष्ट नाही. असलं लिहिणं बरं नाही हे मला तुझ्या वडिलांना सांगायचं होतं. माझा एवढा निरोप सांग त्यांना. सांगशील ना?''

ते उठले तेव्हा तिनं विचारलं, ''कोण आलं होतं म्हणून सांगू नानांना?''

''माझ्या नावाचं काही महत्त्व नाही. अच्युतराव मला ओळखीतही नाहीत. एकोणीसशे वीस सालापासून काँग्रेसचं काम निष्ठेनं करणारा मी एक गरीब माणूस आहे. तुझ्या वडिलांच्या लिहिण्याचा भक्त आहे. त्यांचा चाहता आहे. आणि म्हणूनच त्यांचं कुठे चुकलं तर त्यांना सांगण्याचा मला अधिकार आहे असं मी समजतो. अच्युतरावांना माझं नाव कळलं पाहिजे अशातला भाग नाही. माझा निरोप मात्र कळला पाहिजे.'' जिन्याच्या दारापाशी थबकून सुगंधाकडे हसत बघून त्यांनी विचारलं, ''अच्युतरावांची बी.ए. झालेली मुलगी तूच काय?''

''नानांना मी एकटीच आहे.'' असं सांगताना ती हसली.

''असं का? बी.ए. झालीस, आता काय करतेस?''

''नानांना भेटायला येणाऱ्या माणसांचे निरोप सांगत असते.''

तिच्या या उत्तरानं ते गृहस्थ खूष झाल्याप्रमाणे हसले आणि म्हणाले होते, ''बापाचा खवचटपणाचा गुण उचलला आहेस म्हणायचा!''

मग ते गृहस्थ जिना उतरून निघून गेले होते.

सुगंधा रस्त्याकडच्या खिडकीपाशी गेली होती आणि विचार करीत उभी राहिली होती... त्या गृहस्थांचं म्हणणं काही खोटं नव्हतं 'इशारा' साप्ताहिकातलं लिखाण पुष्कळ लोकांना वाजवीपेक्षा अधिक कठोर आणि फटकळ वाटत होतं. लोकांना नवल वाटत होतं ते या गोष्टीचं की देशातील सर्वच राजकीय पक्षांवर अच्युराव टीकास्त्र सोडीत होते. अलीकडे अलीकडे त्यांची भूमिका अशी झाली होती की कोणत्याच पक्षातले पुढारी देशहिताच्या खऱ्या कळकळीनं वागणारे नाहीत. ज्याला त्याला सत्ता हवी आहे. आणि सत्ता हाती आल्यावर अमुक पक्षाचे नेते सामान्य जनतेचं खरं कल्याण करतील असं म्हणता येत नाही. आपमतलबी पुढाऱ्यांपासून

जनतेचं रक्षण करणं ही चालू घटकेची पहिली गरज आहे. आणि म्हणून पुढाऱ्यांच्या ज्या ज्या लबाड्या आणि चुका दिसतील त्या त्या चव्हाट्यावर कुणी तरी मांडल्याच पाहिजेत. सारी वृत्तपत्रं कोणत्या ना कोणत्या पक्षाला विकली गेलेली आहेत. मिंधेपणामुळे सत्योक्ति आणि स्पष्टोक्ति या दोन्ही गोष्टी वृत्तपत्रांच्या जगात दुर्मीळच नव्हे, तर अशक्य होऊन बसल्या आहेत. वेळोवेळी उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांवर निर्भीड विचार प्रगट करून लोकांना शहाणपणाचा इशारा देण्याचं काम कुणी तरी करायला हवं. ते करण्यासाठी 'इशारा' आहे... नानांचे हे विचार सुगंधाला माहीत होते. पण तिला ते पटत नव्हते. मुख्य म्हणजे त्यांच्या टीकेची तऱ्हा तिला पसंत नव्हती. जे लिहायचं त्यात दुसऱ्याचा मर्मभेद नसावा, पाणउतारा नसावा, जखम नसावी, असं तिला वाटे... ती स्वभावत: निर्मळ आणि आनंदी वृत्तीची होती. जगातला आनंद हसत खेळत घ्यावा अशा विचाराची होती... आपल्या नानांशी ती पुष्कळ वाद घाली. ती त्यांना वारंवार म्हणे, ''किती शत्रू उत्पन्न करता तुम्ही? किती लोकांचं वैर निर्माण करता? वाईटपणा घेता?'' ...अच्युतराव तिचं व्याख्यान ऐकून घेत आणि मग म्हणत, ''माझ्या साप्ताहिकाचं ब्रीदवाक्य तुला माहीत आहे ना? नाही लोभ, नाही भीड!'' ती म्हणे, ''या ब्रीदवाक्याशी माझं भांडण नाही. तुमच्या लिहिण्यातल्या कडूपणाशी आहे, दुसऱ्याला जखम करण्याच्या हौसेशी आहे, जळजळीतपणाशी आहे...'' पण तिला मनातून माहीत असे की आपल्या सांगण्याचा काही उपयोग होणार नाही. नानांच्या नि:स्पृहपणाला मर्यादा नव्हती हेच वाईट होतं. त्यांना कुणाची भीडभीती नव्हती, कशाचाही लोभ नव्हता हेच वाईट होतं... खिडकीत उभं राहून विचार करता करता तिच्या मनात एकदम आलं, आणि आता नानांच्या हाताखाली सुरेंद्र नावाचा नवीन लेखक आला आहे!...

तितक्यात सायकलवरून जोराजोरानं पाय मारीत जाणाऱ्या पोराची आरोळी तिच्या कानावर आली होती.

'रविवारचा इशारा! तीन आणे! इशारा!'

दारावर कुणी तरी टक टक केलं म्हणून तिनं वळून पाहिलं. उंबऱ्यापलीकडे उभा राहिलेला तरुण तिच्या ओळखीचा नव्हता म्हणून तिनं विचारलं, ''कोण पाहिजे?''

''अच्युतराव आहेत ना?''



''नाहीत.'

त्यानं डावं मनगट उचलून घड्याळात पहात म्हटलं, ''त्यांनी तर या वेळेस मला यायला सांगितलं होतं.''

''तसं असेल तर नाना येतीलही इतक्यात. बसा वाटलं तर.''

''माझं नाव भाटे. सुरेंद्र भाटे.''

असं काय?... नानांनी स्टाफवर नवीन घेतलेला तरुण लेखक हाच तर! 'इशारे आणि फटकारे' हे सदर लिहिणारा! गोव्याच्या सत्याग्रहात बेकार गुंड लोक बहुसंख्येने दाखल होत आहेत, असल्या भाडोत्री स्वयंसेवकांची भरती करण्यात धोका आहे, असल्या लोकांना हाताशी धरून सत्याग्रहाची चळवळ नीटपणे पार पडणं पुढाऱ्यांना कठीण जाईल, माकडाच्या हातात कोलीत दिल्यासारखं होईल, लोकांनी दिलेल्या पैशाचा दुरुपयोग होईल–असं ज्यानं आजच्या 'इशारा'च्या अंकात लिहिलं होतं–भयंकर कडक शब्दात लिहिलं होतं–सामान्य मराठी जनता गोवा सत्याग्रहाच्या बाजूची आहे हे माहीत असूनही लिहिलं होत, तो हा तरुण काय? ...सुगंधानं त्याच्याकडे झटकन् पाहून घेतलं. त्याचे कपडे साधे पण स्वच्छ होते. त्याच्या उंच भरदार शरीराला ते शोभत होते. त्याचा चेहरा आकर्षक होताच; परंतु नजर उग्र होती. असमाधान, चीड, निराशा अशा भावनांची एक चमत्कारिक छटा त्याच्या त्या नजरेत होती... त्याचं रूप तिला आवडलं; परंतु त्याची नजर पाहून स्वत:च्या मनाची कोणती प्रतिक्रिया झाली ती तिला कळली नाही. मात्र त्यानं गोवा सत्याग्रहाला उद्देशून जे लिहिलं ते लिहायला नको होतं हा विचार तिच्या मनात आलाच. गोव्याच्या सत्याग्रहाची चळवळ व्हायलाच हवी होती. जितक्या जोरानं होईल तितक्या जोरानं व्हायला हवी होती. गोव्याच्या प्रश्नावर लोकांच्या भावना किती तापलेल्या आहेत ते नेहरूंना कळायला हवं होतं. महाराष्ट्राबद्दल नेहरूंच्या मनात काही चमत्कारिक अढी होती. त्यांच्या भोवतालचे लोक त्या अढीचं व्यवस्थित संगोपन करीत होते. ती अढी दूर व्हायला हवी होती. महाराष्ट्रीय लोकांचा त्याग आणि देशभक्ती कोणती सीमा गाठते ते नेहरूंना कळायला हवं होतं. महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या कानाकोपऱ्यातून जमा झालेले हजारो सत्याग्रही गोव्याची सरहद्द ओलांडून गेले तर पोर्तुगीज सरकार नमल्यावाचून रहाणार नाही, आणि विशेष म्हणजे नेहरूंच्या डोळ्यावरची गैरसमजाची झापड दूर होईल! गोव्याच्या सत्याग्रहाला सारी मराठी

पत्रं पाठिंबा देत होती. नानांच्या पत्राचं धोरण मात्र विचित्र होतं. 'इशारा' नेहरूंवरही सडकून टीका करीत होता, आणि गोवा सत्याग्रहाच्या पुढाऱ्यांनाही कानपिचक्या देत होता!... छे! छे! असलं लिहिणं बरं नव्हतं... 'इशारे आणि फटकारे' या मथळ्याचं नवं सदर 'इशारा'मध्ये सुरू व्हायला नको होतं. या सदराचा तरुण लेखक हा काय?...

त्यानं आपलं नाव तिला सांगितलं तेव्हा तिनं आपलं नाव त्याला सांगायला हवं होतं; परंतु ती सांगण्याचं सौजन्य दाखवावंसं तिला वाटलं नाही. तिच्या मनात त्याच्याविषयी एक सूक्ष्म रूसवा निर्माण झाला होता. एक सूक्ष्म अप्रीती! त्याचं लिहिणं तिला पसंत नव्हतं. नानांच्या हाताखाली काम करण्यासाठी त्यानं यावं हे तिला पसंत नव्हतं. त्याला या बसा म्हणावं, नाना येईपर्यंत त्याच्याशी बोलावं असं तिला वाटलं नाही. ती त्याला म्हणाली, ''बसायचं असलं तर बसा. मला थोडं काम आहे, मला बाहेर जायला हवं.''

त्यानं आत पाऊल टाकलं.

तिनं त्याच्याकडे पुन्हा न पहाता बाहेर पाऊल टाकलं.

ती जिना उतरू लागणार होती; पण तितक्यात अच्युतराव पायऱ्या चढून वर येताना तिला दिसले.

ते तिच्याजवळ आले तेव्हा आत शिरलेला; परंतु अजूनही उभा राहिलेला सुरेंद्र त्यांच्या दृष्टीस पडला. त्यांनी त्याला विचारलं, ''केव्हा आलास?''

सुरेंद्र म्हणाला, ''हा आत्ता येतो आहे एवढाच.''

सुगंधा बापाला म्हणाली, ''मी जरा बाहेर जाऊन येऊ का नाना?''

''विशेष महत्त्वाचं काम आहे का?''

''तसं काही नाही. पण-''

''मग नको जाऊस. हा सुरेंद्र भाटे आला आहे. त्याची तुझी ओळख करून देतो. चहा कर ना चांगल्यापैकी. सुरेंद्र पहिल्यांदाच आला आहे आपल्या घरी.''

सुगंधाचा नाइलाज झाला. ती बापाबरोबर आत वळली. अच्युतरावांनी म्हटलं, ''ही आमची सुगंधा. हा सुरेंद्र भाटे. 'इशारा'ला लाभलेला एक चांगला लेखक.'' सुगंधानं नमस्कार केला. ''माझं नाव मी आधीच सांगून टाकलं होतं.'' असं म्हणून अर्धवट अच्युतरावांकडे अर्धवट सुगंधाकडे बघत सुरेंद्र हसला. त्याचं ते हसणं अगदी मनमोकळं आणि प्रसन्न होतं... त्याच्या तिखट, कडवट लिहिण्यावरून सुगंधाची



कल्पना झाली होती की त्याचं खाजगी बोलणं, चालणं आणि वागणंदेखील तसंच असेल. ती मनाशी म्हणाली, 'हा असं हसू शकतो म्हणायचा? तिनं ज्या तऱ्हेनं त्याच्याकडे बघितलं, त्या तऱ्हेत तिच्या मनातला हा विचार कदाचित् व्यक्त झालाही असेल. तिनं आपल्या बापाकडे वळून बघितलं आणि विचारले, ''चहा करू की कॉफी?''

अच्युतरावांनी सुरेंद्राला विचारलं, ''काय हवं?''

तो म्हणाला, ''चहा! कढत आणि कडक!''

त्याची आणि सुगंधाची पुन्हा नजरानजर झाली तेव्हा ती मनाशी म्हणत होती, 'बरोबर आहे. तुमचं लिहिणं कढत आणि कडक तेव्हा तसाच चहा तुम्हाला आवडत असणार.' तिच्या मनातला हा विचारही कदाचित् तिच्या नजरेत प्रगट झाला असेल. तो तिच्याकडे पाहून किंचित् हसला खरा... पण मग तोंड फिरवून ती दूर झाली आणि आतल्या स्वैंपाकघराकडे गेली...

चहा घेता घेता अच्युतराव सुगंधाला सांगू लागले, ''याला राहायला चांगलीशी जागा मिळत नाही. एका गल्लीतल्या वाड्यातली खोली सध्या घेतली आहे; पण ती खोली म्हणजे काय खोलीच आहे! वाड्यात पंचवीस बिऱ्हाडं आहेत. नळ एकच आहे. संडाससुद्धा-''

सुरेंद्र हसून अच्युतरावांना म्हणाला, ''यांना माझी दया वाटावी असा तुमचा प्रयत्न दिसतो; परंतु माझी अवस्था तुम्हाला वाटते तितकी दया करण्यासारखी नाही. आणि एक गोष्ट लक्षात ठेवा की गरिबीची हालांची सवय आहे मला. माझा जन्म काही श्रीमंतीत गेलेला नाही. गरिबीशी झगडतच मी आभ्यास केला, एम.ए. झालो. गरिबीची लाज मुळीच वाटत नाही मला. श्रीमंत असतो, माझे आईबाप असते, त्यांच्या लाडात वाढलो असतो तर कदाचित् विद्या करण्याऐवजी उनाड निघालो असतो मी! माझं आयुष्य हालअपेष्टात गेलं याचा खेद होत नाही मला. शरीरानं आणि मनानं कणखर झालो ते कदाचित् त्यामुळेच असेल. माणसाजवळ पैसा नसला तरी चालेल, पण माणूस कणखर असावा...''

बोलताना तो अच्युतरावांकडे पहात होता. सुगंधा त्याच्याकडे बघत होती. आईबापावाचून गरिबीत वाढलेला आहे तर हा, असं मनाशी म्हणत होती. त्याच्या पूर्वचरित्राबद्दल नवीन माहिती कळल्यासारखं तिला वाटत होतं. स्वत:विषयी तो